मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# भूमीपुत्रांसाठी लढणारे युवा नेतृत्व: विशालभाऊ आहेर

## जाधववाडी- चिखली-मोशी-कुदळवाडी परिसराच्या विकासासाठी धडाडीचे पाऊल

### विकसनशील प्रभाग : 02

पिंपरी | प्रतिनीधी :जाधववाडी आणि आसपासच्या परिसरामध्ये आपल्या अष्टपैलू सामाजिक कार्यामुळे लोकप्रिय असलेले नाव म्हणजे विशाल भाऊ आहेर. सामान्य शेतकरी कुटुंबातून आलेले विशाल भाऊ, कोणत्याही राजकीय पार्श्वभूमीशिवाय केवळ आपल्या कार्यकर्तृत्वाच्या बळावर एकटे लढत आहेत. त्यांची ओळख एक धडाडीचे युवा नेते अशी आहे. प्रभागातील नागरिकांच्या समस्यांसाठी तत्परतेने पुढाकार घेऊन समस्या सोडविण्यासाठी प्राधान्य देतात. नागरिकांच्या सुख-दुखःमध्ये ते त्यांच्या पाठीशी ठामपणे उभे असतात. म्हणून प्रत्येकांना विशालभाऊ आहेर हे आपल्या हक्काचे वाटतात. महापालिका निवडणुकीत त्यांना संधी मिळाल्यास प्रभागाच्या विकासासाठी तळमळीने कार्य करायचे आहे. तसेच नगरसेवक म्हणून नव्हे तर जनसेवक म्हणूनच आपण सेवा करणार असल्याचे सांगतात.



### माझा प्रभाग
### माझा उमेदवार!

### शेतकऱ्यांचे प्रश्न आणि सामाजिक कार्याचा गाभा

विशाल भाऊंच्या कार्याचा मूळ गाभा शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवणे हा आहे. त्यासोबतच इतर विधायक सामाजिक उपक्रमातून त्यांनी आपल्या कामाची छाप लोकांवर पाडली आहे.

'कोणी सोबत असेल तर त्याच्यासह, नाहीतर त्यांच्याशिवाय' अशा निर्धाराने ते आपल्या कार्याचा आलेख सतत उंचावत आहेत.
या भागातील विकासात्मक प्रकल्प मार्गी लावून येथील मूलभूत प्रश्न सोडवण्याची इच्छाशक्ती असलेले विशालभाऊ आहेर आगामी निवडणुकीसाठी इच्छुक आहेत.

### भाऊ यासाठीही असणार अग्रेसर

दिवसेंदिवस वाढत्या औद्योगिकीकरणामुळे आपल्या या भागाचा विस्तार होत आहे त्यामुळे या भागात महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून अनेक लोक उद्योग_व्यवसाय, रोजगाराच्या निमित्ताने या ठिकाणी वास्तव्यास आलेले आहेत त्यामुळे नव- नवीन सोसायटी/ घरकुल या ठिकाणी उभे राहिले आहेत.अशा सर्व सोसायटी धारकांचे संघटन करत त्यांचे प्रलंबित प्रश्न,त्यांना पालिकेच्या माध्यमातून आवश्यक असलेल्या नागरी सुविधा तसेच बिल्डरांकडून प्रलंबित सोसायटी धारकांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी ते नेहमीच अग्रेसर असतात.... तसेच तरूण युवकांनी नोकरी कडे न वळता स्वतःचा व्यवसाय व त्यासाठी मदत करणारा तरूणांचा हक्काचा भाऊ म्हणून विशालभाऊकडे पाहिले जाते.





### कोविड-काळात केलेले अतुलनीय कार्य

कोविड-19 च्या महामारीच्या काळात त्यांनी केलेले कार्य अविस्मरणीय आहे. नागरिकांची मूलभूत गरज ओळखून, विशाल भाऊंच्या माध्यमातून रोज ८ टन भाजीपाला आणला जायचा आणि त्याचे किट तरुण कार्यकर्त्यांमार्फत घरोघरी पोहोचवले जायचे. तसेच, रोज हजारो लोकांना अन्नदान केले जात असे. येथील नागरिक आवर्जून सांगतात की, "अशा महामारीच्या काळात स्वतःच्या जीवाची पर्वा न करता इतरांची अडचण सोडवण्यासाठी रस्त्यावर उतरणारा नेता क्वचितच पाहायला मिळतो."

### सभागृहात जाधववाडीचा आवाज

सामाजिक कार्याचा प्रचंड आयाम असलेले विशाल भाऊ आहेर आता लोकप्रतिनिधी म्हणून जाधववाडीचे अनेक प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्यास सज्ज आहेत. त्यांना पदाची महत्त्वाकांक्षा नसली तरी, हाती पद असल्याशिवाय कामे मार्गी लागत नाहीत या उद्देशाने त्यांना ही संधी हवी आहे. भूमीपुत्रांसाठी लढणारे विशाल भाऊ आता सभागृह गाजवण्याच्या तयारी आहेत. त्यांना जनतेची साथ मिळेल, असा आत्मविश्वास आहे.

### मूलभूत सुविधांसाठी संघर्ष

जाधववाडी आणि नजीकच्या परिसराचा कायापालट करण्याची त्यांची धडपड आहे. या भागाला चांगले रस्ते, शुद्ध पाणी, अखंडित वीजपुरवठा, उद्याने, प्रभावी कचरा व्यवस्थापन आणि सुसज्ज रुग्णालय, खेळांडूना प्रोत्साहित करणे, तसेच गुन्हेगारीला आळा घालणे यावर त्यांचे व्हिजन आहे. महिलांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी वारंवार प्रशिक्षण शिबिरे आयोजित करणे आणि त्यासाठी जागा उपलब्ध करून देण्यात ते कायम पुढाकार घेतात. महिला सक्षमीकरणासाठी सातत्याने विशालभाऊंचा पुढाकार असतो. त्यांच्या 'जय बजरंग मित्र मंडळ आहेरवाडी यांच्या माध्यमातून ते आरोग्य शिबिर, रक्तदान शिबीर यासह अनेक विधायक उपक्रम सातत्याने राबवतात.



### भूमीपुत्रांना न्याय आणि रोजगार निर्मिती

प्राधिकरणाच्या माध्यमातून विकास होत असताना ज्या भूमीपुत्रांना आपल्या जमिनी द्याव्या लागल्या, त्यांना त्यांचा योग्य आणि वेळेत मोबदला मिळावा यासाठी विशाल भाऊ सातत्याने पुढाकार घेतात. याशिवाय, सुशिक्षित बेरोजगारांना आणि भूमीपुत्रांना रोजगार मिळावा यासाठी ते प्रयत्नशील आहेत. त्यांच्या माध्यमातून अनेक युवकांना आतापर्यंत रोजगार मिळाला असून, महिला सक्षमीकरणासाठी उचललेली त्यांची पाऊले देखील अत्यंत कौतुकास्पद आहेत.